701 7

वित्तीय संस्थांकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी घरबांधणी अग्रिम विषयक अटीत दुरुस्ती

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक:घबांअ १०९३/प्र. क्र. १३५/९३/विनियम
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: १८ मे १९९४

पहावे : शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक घबांअ १०८८/[१५५]/विनियम, दिनांक ६ नोव्हेंबर, १९९० [महत्वाच्या अटीची पूर्तता मधील अट क्रमांक - ३]

निर्णय :

उपरोक्त दिनांक ६ नोव्हेंबर १९९० च्या शासन निर्णयातील "महत्वाच्या अटीची पूर्तता" मधील अट क्रमांक ३ पुढीलप्रमाणे आहे -

"अट क्रमांक ३ - घराच्या किंमतीविषयी नोंदणीकृत मुल्यांकन अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र सादर करावे लागेल."

नवीन व जुन्या घराच्या संदर्भात वरील अटीची पूर्तता करण्यासाठी संबंधिताकडून मुल्यांकन प्रमाणपत्र घेताना अशा मुल्यांकनासाठी कोणत्या प्राधिकाऱ्यांकडील प्रमाणपत्र व मुल्यांकन किंमत ग्राहय समजावी याबाबतचा प्रश्न शासनाकडे बराच काळ विचाराधीन होता. यास्तव आता शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

अ] नव्या घराच्या संदर्भात मुल्यांकन किंमत ग्राहय धरण्यासाठी नव्या घराची किंमत दुय्यम निबंधक यांनी मान्य करून नोंदणी फी आकारलेली असल्याने नव्या घराच्या संदर्भात नोंदणी केलेल्या दस्तामध्ये दर्शविलेली किंमत ग्राहय धरण्यात यावी. तथापि संबंधितानी दुय्यम निबंधकाकडील नोंदणी फी भरल्याबाबतचे प्रमाणपत्र/पावती सादर करणे आवश्यक आहे.

ब] जुन्या घराच्या संदर्भात मुल्यांकन किंमत ग्राहय धरण्यासाठी इंडियन इन्स्टीटयूट ऑफ व्हॅल्युअर्सचा सभासद असलेल्या कोणत्याही स्थापत्य अभियंता किंवा वास्तुशास्त्रज्ञ यांनी केलेले मुल्यांकन ग्राहय मानून त्यांचेकडील प्रमाणपत्र आधारभूत धरण्यात यावे.

HBA
50 16
1817

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
16 JUN 1994

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

बा. कृ. कुलकर्णी
शासनाचे अवर सचिव, वित्त विभाग.
(कृ.मा.प.

शा. प्र. लि. नि. सेवा-एच-517(13000)-10-5-94)

90599
1817